नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31 / 10 / 2022 (सोमवार)

## अपघातात मृत्यू झालेले पोलीस अंमलदार पंकज गोमेकर यांच्या कुटुंबियांना ०१ कोटी रूपयाची मदत नागपूर ग्रामीण पोलीस दल व एचडीएफसी बँकेचा पुढाकार

नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कार्यरत असलेले पोलीस शिपाई पंकज विश्वनाथ गोमेकर, बक्कल नंबर ४५५ यांचे दिनांक १२/१०/२०२१ रोजी अपघाती निधन झाले होते. या अपघातामध्ये मृतक पंकज गोमेकर यांच्या परिवाराला सहाय्य करण्याच्या दृष्टीकोणातून नागपूर ग्रामीण पोलीस दल व एचडीएफसी बँकेने सकारात्मक पाऊले उचलली. त्यानुसार दिनांक ३१/१०/२०२२ रोजी एचडीएफसी बँकेकडुन प्राप्त ०१ कोटी रुपये रकमेचा वेतन विमा सहायता निधीचा धनादेश पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद यांच्या हस्ते मृतक पंकज गोमेकर यांची आई सौ. सिंधु विश्वनाथ गोमेकर यांना देण्यात आला आहे. यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री. संजय पुरंदरे, एचडीएफसी बँकेचे कंसल्टर हेड श्री. महेश धकाते व श्री शरद मिश्रा यांची उपस्थिती होती. अपघातामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना वेळीच सहाय्यता मिळावी याकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक श्री विशाल आनंद हे सदैव प्रयत्नरत असल्याबाबत यावेळी त्यांनी आश्वासन दिले आहे.




पोलीस अंमलदार गोमेकर कुटुंबियांना ०१ कोटी रूपयाचा धनादेश देतांना
पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद .

## चोरी

१) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत दिनांक ३०/१०/२०२२ दुपारी १३.०० वा दरम्यान अज्ञात चोरटयाने फिर्यादी सौ छाया गजानन भाकरे वय ४० रा आलोडा, लोणी ता. वरूड जि. अमरावती हि तिच्या भावाकडे जात असता जलालखेडा बस स्टॉपवर बसमध्ये बसतेवेळी तिच्या पर्समध्यें ठेवलेली सोन्याची पोत ०७ ग्रॅम किंमती १५,०००/– रू नेल्याने अज्ञात ईसमावर पोलीस स्टेशन जलालखेडा येथे गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन जलालखेडा करीत आहे.

## दुखापत

२) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत दिनांक ३०/१०/२०२२ रोजी रात्री १९.०० वा. फिर्यादी श्री मानिष गोविंदरावजी भोळके वय ३६ वर्षा रा पांजराकाटे ता. काटोल हा आपले मित्र सचिन जयपुरकर सोबत वर्धाफाटा येथे उभा असता फिर्यादीने आरोपी १) अभिजीत रमेश चांभारे रा. म्हाळगीनगर नागपुर २) किरण रामरावजी काळे रा. अंबाझरी नागपुर ३) ऋषी काळे रा. काळै रा. अंबाझरी नागपुर यांना त्यांच्या रोडवर उभ्या ठेवलेल्या गाडयाने लोकांची गर्दी होत आहे असुन बाजुला करण्याबाबत हटकले असता आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी व त्याचे मित्रास हातबुक्की व लाकडी काडीने डोक्यावर मारुन जखमी करुन दुखापत पोहचवुन पाहुन घेण्याची धमकी दिली . सदर प्रकरणी आरोपींविरुध्द पो.स्टे कोंढाळी येथे गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कोंढाळी करीत आहे.

## अपघातात मृत्यु

३) पो.स्टे. भिवापुर:– अंतर्गत दिनांक २८/१०/२०२२ रोजी १६.०० वा. दरम्यान मृतक ट्रॅक्टर चालक जिवन चुडीराम डहारे वय २० वर्ष रा चिचाळा तं. भिवापुर हयाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ३४ बीआर ७३३४ ने हेडसिंबा शिवारातील जंगला मधुन कच्या रस्त्याने भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन कच्च्या रोड च्या बाजुला असलेल्या वळनाच्या १५ फुट खोलीच्या पाठामध्ये ट्रक्टर चे ब्रेक न लागलयाने ट्रक्टर पलटी झाल्याने आरोपी मृतक ट्रॅक्टर चालकयाचे डोक्याला गंभीर मार लागुन मरण पावल्याने फिर्यादी सर. तर्फे फिर्यादी सफौ १५८६ मंगेष वाघ पो.स्टे. भिवापुर चे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवपुर येथे आरोपी मृतक ट्रॅक्टर चालकाविरुध्द गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन भिवापुर करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

**४) पो.स्टे. खापा :–** अंतर्गत दि. २९.१०.२२ रोजी रात्री ०८/०० वा सुमारास यातील मुतक नामे निरज मनोहर काकडे वय २५ वर्ष रा वाकी याने कॅन्सर बिमारीचा आजाराला त्रासुन चिचघाट शिवारात फाशी घेवून आत्महत्या केल्याने सदर प्रकरणी पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन खापा करीत आहे.

**५) पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत दि. २९.१०.२२ रोजी १०/०० वा दरम्यान यातील मुतक भुषण ज्ञानेश्वर लुटे वय २६ वर्ष रा. प्लॉट नं. १२, हिरवी ले आउट, नंदनवन, नागपुर हा महालगाव येथील एस.एस.फुड कंपनी मध्ये फेब्रिकेशनचे काम करित असतांना ३० फुटाचे अंतरावरून खाली पडल्याने मरण पावल्याने सदर प्रकरणी पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**